# हिंद मजदुर किसान पंचायत

## दलित, आदिवासी, भटके–विमुक्त, स्त्रिया आदि कष्टकऱ्यांवरील दडपशाही विरोधी संघर्ष !

## जनतेच्या राज्यासाठी क्रांतीकारक संघर्ष ! !

प्रिय कष्टकरी बहिणी व भावांनो, क्रांतीकारक अभिवादन,

गोरे इग्रज गेले आणि भारतीय काळ्यांचे राज्य आले चाळीस वर्षे कॉंग्रेस पक्षाने आपल्या नावाने राज्य केले. परंतु फायदा मात्र झाला जातीयवादी, भांडवलदार व सधन शेतमालकांचा भूमिहीन शेतमजूर, गरीब-मध्यम शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी भटके विमुक्त, स्त्रिया यांची लूट मात्र सारखी चालली आहे. दुष्काळ, रोजगार चारा-पाणी जळण यासारख्या मुलभूत प्रश्नांवर लक्ष देण्याऐवजी जास्तीत जास्त पैसा सैन्य व युद्ध सामुग्रीवर खर्च केला जात आहे. परदेशांकडून भरमसाठ कर्ज घेऊन आज देश व आपण सर्व कष्टकरी गहाण पडलो आहोत. या उसन्या दादागिरीच्या जोरावरच शेजारच्या छोट्या राष्ट्रांवर दहशत बसविली जात आहे. श्रीलंकेत विनाकारण आपले हजारो सैनिक मारले आहेत. सारा देश लूटून या जातीयवादी शक्ति, भांडवलदार, सधन शेतमालक यांच्या सोयिची आर्थिक, राजकीय, शैक्षणिक धारणे आखली जात आहेत.

कारखानदारांच्या बेफाम नफ्यासाठी निसर्गाची सतत लूट केल्यामळे निसर्गाचा समतोल ढळला आहे परिणामी दुष्काळ कायम चा स्थिरावला आहे याचे खापर मात्र हे सरकार निर्लज्जपणें आदिवासी, भटका विमुक्त, दलित स्त्रिया शेतकरी भूमिहीन शेतमजूरांवर फोडत आहे आपल्या ताब्यातील जमिनी हिसकावून घेऊन गावे उध्दवस्त केली जात आहे. मागच्या महिन्यात शिरपूर शहादा ( जि. धुळे ) तालुक्यातील आदिवासीची २०० गावे सरकारच्या वन व महसुल खात्यांन बंदुकीच्या जोरावर उध्दवस्त केली ५० हजाराच्यावर माणसांचे जीवन उध्दवस्त केले आहे.

४० वर्षात आपले मूलभूत प्रश्न अजिबात सुटले नाहीत परिणामी आपल्या पोटातील भुकेचा वणवा देशभर पसरला आहे. कष्टकऱ्यांचे उठाव सुरु झाले आहेत. गेंड्याचे कातडीचे फॅसिस्ट सरकार लोकशाहीचा मुडदा पाडून सैन्य व बदुकीच्या जोरावर आपली चळवळ खतम करु पहात आहे.

यादेशात घाम गाळणाऱ्या जनतेचे राज्य आणण्यासाठी कामगार व ग्रामिण श्रमिकांनी एकत्र येऊन क्रांतीकारक संघर्ष सुरु करायचा आहे. देशातील लढाऊ जनतेला साथ द्यायची आहे. हिंद मजदुर किसान पंचायतच्या लाल झेंड्याखाली देशभर हा लढा चालला आहे.

बुधवार दि. १७ फेब्रु ८८ : शिवूर ( ता वैजापूर ) गुरुवार दि. १८ फेब्रु. ८८ : फरशी किन्होळा ता. सिल्लोड

या दोन्ही ठिकाणी दु १२ वाजता 'रास्ता रोको' करण्यात येणार आहे, तरी आपण आपले लाल झेंडे घेऊन मोठ्या संख्येने यावे ही विनंती.

-आपला कार्यक्रम-

१) कसणाऱ्यांना जमीन व प्रत्येक भूमिहीनास घरासाठी जागा २) सर्व मोठे उद्योग, व्यापार व वित्तिय महामंडळाचे राष्ट्रीयकरण, तसेच त्यांचे कामगार द्वारा व्यवस्थापन ३) अ) भूमिहीन, गरीब शेतकरी, कामगारांवरील सरकारी व सहकारी कर्जांची माफी. ब) पीक विमा सुरु करणे क) कृषी व कारखान्यातील उत्पादन किमतीमध्ये समतोल ड) गंगा व कृष्णा नद्या कालव्याद्वारे जोडणे इ) किमान व कमाल उत्पन्नाचे प्रमाण १ ते १० पर्यंत निर्धारित करणे ४) राज्यांना अधिक स्वायत्तता व काही प्रश्नांवर जनमत संग्रह व्यवस्थेची घटनेत तरतूद करणे ५) एक गाव किंवा काही गांवे मिळून एक केन्द्रे बनविले आणि त्या केंद्रामध्ये उच्चतर प्रशासनिक समन्वय यंत्रणा उभा करणे ६) कार्यपालिकांमधील सर्व अधिकाऱ्यांची नागरिकांद्वारे निवड करणे ७) सर्वांना सक्तिचे व मोफत शिक्षण ८) रोजगार हा मुलभूत हक्क घटनेत समावेश करणे व बेरोजगाराना निर्वाहे भत्ता ९ ) विद्यमान सेवेमध्ये कपात करुन सीमा सरक्षणासाठी आवश्यक तेवढे सैन्य ठेवणे सार्वभौतिक सैनिक प्रशिक्षण आणि वरचेवर सैनिक शिक्षा शिबीरांची व्यवस्था या उपक्रमामुळे कायम स्वरुपाची सेना उपलब्ध होईल. आणि सीमांचे संरक्षण योग्य प्रकारे करता यईल. १०, आंतरराष्ट्रीय धोरणाच्या सदर्भात दोन वड्या शक्तिच्यामध्ये गटनिरपेक्ष परदेशी धोरण ११) मंडल आयोग शिफारसी लागू करणे १२) बोफोर्स करार रद्द करणे स्विझर्लंडच्या बँकातील भारतीयांची खाती जप्त करावीत व त्याबाबतची माहिती प्रसिध्द करणे १३) क) झाडापासून बनविले जाणारे धागे व कापड यावर कायद्यान्वये बंदी ख) साखर उद्योगातील चिपाडांचा जळण म्हणून उपयोग करण्यास प्रतिबंध आणि कागद निर्मितीसाठी त्यांचा उपयोग ग) कागद उद्योगात झाडांच्या उपयोगास प्रतिबंध घ) हिमकिप कार्यकर्त्याद्वारे वृक्षारोपण व संवर्धन अभियान सूरु करणे १४) बेकारी निर्माण करणारा कॉम्प्युटर तसेच स्वयंचलित यंत्रावर प्रतिबंध १५) जीवन निर्देशांकानुसार वेतन व भत्यांमध्ये सुधारणा १६) बहुराष्ट्रीय कंपन्याबरोबरचे सर्व करार रद्द करणे व त्यांना आपपल्या देशात परत पाठविणे १७) काळे कायदे रद्द करणे आणि विविध क्षेत्रातील जन आंदोलनाविरुद्ध ह्या काळ्या कायद्याच्या वापरास प्रतिबंध १८) बंद गिरण्या, कारखाने सरकारनें ताब्यात घेऊन कामगारांच्या भागिदारीने चालवाव्यात १९) दलित, आदिवासी, भटके–विमुक्त, महिला व अल्पसंख्याकांवरील अत्याचारांचे निर्मूलन २०) लोकाधारित नवे जमीन व पाण्याचे धोरण

## औरंगाबाद जिल्हा लोकसमिती

आपले – रामदास शेजवळ (संयोजक ), शांताराम पंडेरे, उत्तम आव्हाड, केशरबाई दनके सिताराव बर्डे, चंद्रमणी लभाने, पुंजाबा तुपे, धोंडिराम साठे, गंगाधर त्रिभुवन, नाना सावंत, श्रीपत पवार, नामदेव वाघ, समिंदराबाई दनके रामभाऊ सोनावणे, दादा गायकवाड, सुखलाल, पुसे,

---

**कार्यालय – चव्हाण निवास, खोकडपूरा, दै. अजिंठा प्रेसजवळ, औरंगाबाद–४३१००१.**

---

मनोज प्रिन्टर्स चौराहा,